# पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडातील भारतीय संघराज्याची वाटचाल

**प्रा.ए.बी.मोहिते** म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी

---

**गोषवारा:**

भारतीय संघराज्याच्या विकासाला स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत सुरुवात झाली होती.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेच्या माध्यमातून भारताच्या गरजांना अनुसरून भारतीय संघराज्य व्यवस्थेची निर्मिती करण्यात आली. भारत हा खंडप्राय देश असल्यामुळे या भूप्रदेशावर कोणतेही एकच शासन इतिहास काळात राज्य करु शकलेले नाही. ब्रिटिश राजवटीत मांडलिक संस्थानांचा भूप्रदेश आणि ब्रिटिश अधिपत्याखालील भूप्रदेशाचे प्रांत निर्माण करून राज्यकारभार करण्यात आला. या व्यवस्थेमध्ये काही महत्त्वाचे अधिकार मध्यवर्ती सत्तेला व काही अधिकार प्रांतीय व स्थानिक शासनाला देण्यात आले होते. 1909,1919 आणि 1935 च्या कायद्याने आधुनिक भारताच्या संघराज्य निर्मितीला चालना मिळालेली दिसून येते.1935 च्या कायद्याने केंद्रीय स्तरावर द्विदल शासन पद्धती स्वीकारण्यात आली. तसेच केंद्रीय शासन व प्रांतिक शासन यांच्यातील अधिकार व सत्तेची विभागणी तीन सूची किंवा याद्या निर्माण करून करण्यात आली. याच कायद्याने सांघिक न्यायालयाची निर्मिती करण्यात आली.स्वातंत्र्योत्तर काळात राज्यघटनेद्वारे भारत हा एक राज्यांचा संघ म्हणून अस्तित्वात आला. या संघाचा राज्यकारभार करण्याची व पायाभरणीची जबाबदारी पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या वर आली. नेहरुंच्या समोर देशाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित ठेवून अन्नधान्याची टंचाई, संस्थानांच्या विलीनीकरणाची समस्या, स्थलांतरितांची समस्या, पायाभूत सुविधांची समस्या,सीमावादाची समस्या,कम्युनिस्टांचे उठाव, सांप्रदायिक दंगलींची समस्या,भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितांची समस्या,भांडवलाची कमतरता, महासत्तांचे आंतरराष्ट्रीय राजकारण व त्यासंबंधी भारताची भूमिका अशा अनेक समस्यांवर लोकशाही मार्गाने मात करून भारतीय संघराज्याची वाटचाल करण्याचे आव्हान नेहरूंसमोर होते. नेहरूंनी देशाचे प्रमुख नेते व पंतप्रधान म्हणून आपल्या कार्यकाळात भारतात संघराज्य व्यवस्था रुजविण्याचा प्रयत्न केला. त्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.

**प्रास्ताविक:**

स्वातंत्र्यपूर्व काळात कॅबिनेट मिशन योजनेनुसार 02 सप्टेंबर 1946 रोजी हंगामी सरकारची स्थापना करण्यात आली. हे अंतरिम(हंगामी)सरकार म्हणजे व्हाईसरॉय चे कार्यकारी मंडळ होते. त्याचे उपाध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. शपथविधीनंतर पहिल्याच आठवड्यात घटना समितीच्या कामकाजाची पूर्वतयारी सुरू करण्यात आली. मुस्लिम लीगने घटना समितीच्या कामकाजावर बहिष्कार घातला. होता 09 डिसेंबर 1946 रोजी घटना समितीची पहिली बैठक बोलाविण्यात आली होती. 1947 च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याद्वारे ब्रिटिश भारत व मांडलिक संस्थाने स्वतंत्र झाली.1947 ते 1950 या काळात सरदार वल्लभभाई पटेल व पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली संस्थानी प्रदेश भारतीय संघराज्यात समाविष्ट करण्यात आले. काही संस्थाने विद्यमान प्रांतांमध्ये विलीन करण्यात आली,तर काही संस्थाने नवीन प्रांतांमध्ये समाविष्ट करण्यात आली. अशा रीतीने लोकसत्ताक पद्धती असणारा मानवी इतिहासातील सर्वात महान प्रयोग 1950 पासून भारतात सुरू झाला.स्वातंत्र्याबरोबर भारताची फाळणी करण्यात आली. परिणामी उरलेल्या भारताचे असंख्य तुकडे पडतील व पुन्हा भारत स्वातंत्र्य गमावून बसेल ही भीती राजकीय धुरिणांना होती. म्हणून संविधानाने संघराज्य सदृश्य राजकीय प्रणाली स्वीकारली.या व्यवस्थेत केंद्रीय शासन प्रबळ झाले तर घटक राज्यांना मर्यादित अधिकार देण्यात आले. या पार्श्वभूमीवर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडातील भारतीय संघराज्याची वाटचाल कशी झाली होती. याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व**:

भारतीय संघराज्याची निर्मिती झाल्यानंतर व नव्या राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर देशाचे पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. धर्माच्या आधारे झालेली देशाची फाळणी दारिद्र्य, उपासमार, आर्थिक दुरावस्था, पायाभूत सुविधांचा अभाव, गटबाजीचे आंतरराष्ट्रीय राजकारण, संस्थानांचे विलीनीकरण, सीमेवरील तणाव या सर्व पार्श्वभूमीवर देशातील बहुसांस्कृतिक समाजात ऐक्य निर्माण करून घटक राज्यातील नेतृत्वाला राष्ट्र उभारणीच्या कार्यात सहभागी करून घेण्यासाठी केंद्र व राज्यांचे परस्पर संबंध कसे होते? नवीन संघराज्याच्या वाटचालीत नेहरूंचे भूमिका कोणती होती?याचा अभ्यास करणे सध्याच्या काळात महत्त्वाचे आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत शोधिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

1) भारतीय संघराज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.

2) भारतीय संघराज्य व्यवस्थेचे घटनात्मक स्वरूप जाणून घेणे.

3) केंद्र-राज्य संबंधाच्या अनुषंगाने भारतीय संघराज्याचे स्वरूप अभ्यासणे.

4) पंडित नेहरूंच्या कार्यकाळातील संघराज्याचे स्वरूप अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहीतके:**

प्रस्तुत शोधनिबंधसाठी पुढील गृहीतके मांडण्यात आली आहेत.

1)भारतीय संघराज्य व्यवस्थेचा स्वातंत्र्यपूर्व काळापासून विकास होत आला आहे.

2) भारतीय संघराज्य हे घटनात्मक अधिकारदृष्ट्या केंद्राकडे झुकणारे आहे.

3) नेहरूंच्या कालखंडातील संघराज्याचे स्वरूप साधारणतः सहकारी संघराज्याचे असल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी द्वितीय संदर्भ साधनांच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात आले आहे. आणि त्या तथ्यांच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**संघराज्य निर्मितीच्या दोन प्रवृत्ती:**

आज जगात अस्तित्वात असलेल्या संघराज्यांची निर्मिती दोन प्रवृत्तीतून किंवा पद्धतीने झालेली दिसून येते.

**1) केंद्राकर्षी प्रवृत्ती:**

या पद्धतीत स्वतंत्र राज्ये आपल्या समान उद्दिष्टांच्या पूर्तीतेसाठी संघराज्याची निर्मिती करतात. या पद्धतीत घटक राज्यांचे ध्वज, राज्यघटना, नागरिकत्व स्वतंत्र असते. केंद्र व राज्यात अधिकारांची विभागणी होऊन उर्वरित अधिकार राज्यांना दिले जातात. त्यामुळे केंद्र व घटक राज्यांमध्ये तणाव निर्माण होत नाही. राज्यांना फुटून बाहेर पडण्याचा अधिकार नसतो. अमेरिकेतील 13 वसाहतींनी स्वतंत्र झाल्यानंतर या पद्धतीचे संघराज्य निर्माण केलेले दिसून येते.

**2) केंद्रोत्सारी प्रवृत्ती:**

केंद्रोत्सारी किंवा विकेंद्री पद्धतीने निर्माण झालेल्या संघराज्यात स्वतंत्र देश किंवा राज्ये समाविष्ट होत नाहीत. देशातच विविध प्रांत, संस्थाने व प्रदेश असतात. त्यामुळे वेगळी राज्यघटना, नागरिकत्व, झेंडा अशा स्वरूपाची स्वायत्तता दिली जात नाही. राज्यकारभाराच्या सोयीसाठी घटक राज्यांची निर्मिती केली जाते. यामध्ये केंद्रीय शासन व घटक राज्य यांच्यात कोणतेही करार किंवा अटी घातल्या जात नाहीत. भारतीय संघराज्य हे दुसऱ्या प्रवृत्तीतून निर्माण झालेले आहे.(अपवाद- जम्मू आणि काश्मीर)देशाचे ऐक्य टिकविण्यासाठी केंद्राला ज्यादा अधिकार देण्यात आले असून उर्वरित किंवा शेष अधिकारही केंद्राकडे देण्यात आले आहेत.

संघराज्य निर्मितीची प्रक्रिया ही संबंधित देशातील राजकीय,सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, ऐतिहासिक, धार्मिक, वांशिक,भाषिक, सांस्कृतिक घटकावर अवलंबून असते. राष्ट्रीय सुरक्षा, व्यापार, दळणवळण, राष्ट्रीय ऐक्य, पायाभूत सुविधांचा विकास इत्यादी घटकांमुळे संघराज्य व्यवस्था असणाऱ्या देशांत केंद्रीय शासन प्रबळ होत असल्याची प्रवृत्ती दिसून येत आहे.

**ब्रिटिशकालीन भारतीय संघराज्य व्यवस्था:**

स्वातंत्र्यपूर्वकाळात 1935 च्या कायद्याने ब्रिटिश भारतात संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. केंद्र आणि प्रांत यांच्यात अधिकारांची व कार्याची विभागणी करणाऱ्या याद्या निर्माण करण्यात आल्या. त्यानुसार संघ सूचित 59 विषय प्रांत सूचित 54 विषय व सामायिक सुचित 36 विषय समाविष्ट करण्याच्या करण्यात आले. या कायद्याने भारतात एकूण 11 प्रांत निर्माण करण्यात आले (मद्रास, मुंबई, बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार, मध्य प्रदेश, आसाम, पश्चिम सीमा प्रांत, ओरिसा व सिंध) आणि सहा चीफ कमिशनरच्या नियंत्रणाखालील प्रदेश ठेवण्यात आले.(दिल्ली,कुर्ग,अजमेर, मेवाड,अंदमान- निकोबार इ.) या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली. प्रांतातील द्विदल शासन पद्धती संपुष्टात आणून राज्यकारभाराचे अधिकार लोकप्रतिनिधींच्याकडे देण्यात आले. या कायद्यात ऑल इंडिया फेडरेशनची तरतूद करण्यात आली होती.या कायद्याने फेडरल कोर्टाची स्थापना करण्यात आली. रिझर्व बँकेची ही स्थापना करण्यात आली. लोकसेवा

आयोग, दहा टक्के मतदानाचा अधिकार, अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व प्रदान करण्यात आले. या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता दिली असली तरी गव्हर्नरलाही अनेक अधिकार देण्यात आले होते.

**स्वातंत्र्योत्तर भारतीय संघराज्य व्यवस्था:**

1946 मध्ये केंद्रीय असेंब्ली निवडणुकीचा जाहीरनामा जवाहरलाल नेहरूंनी तयार केला होता. या जाहीरनाम्यात त्यांनी काँग्रेसची व त्यांची स्वतःची भूमिका स्पष्ट केलेली आहे. भारत हे स्वतंत्र लोकशाहीवादी राष्ट्र व्हावे आणि सर्व नागरिकांच्या मूलभूत हक्कांना राज्यघटनेने मान्यता व हमी द्यावी अशी काँग्रेसची भूमिका आहे. तसेच ती घटना संघराज्यात्मक असावी व घटक राज्यांना भरपूर स्वायत्तता असावी. भारताच्या राजकीय व्यवस्थेविषयी पंडित नेहरूंची स्वातंत्र्यपूर्व काळातील ही भूमिका होती. परंतु भारताची फाळणी व निर्माण झालेल्या इतर समस्यांना प्रत्यक्षात पंतप्रधान म्हणून नेहरूंनाच भिडावे लागले होते. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात नेहरूंच्या भूमिकेत बदल झालेला जाणवतो.

प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ नाणी पालखीवाला यांच्या मते,"जेव्हा एखादे प्रजासत्ताक जन्माला येते, तेव्हा त्या ठिकाणी काही विशिष्ट स्वरूपाची यंत्रणा निर्माण करण्याची जबाबदारी नेत्यांना पार पाडावयाची असते"

भारतात ही जबाबदारी घटना समितीवर होती. तसेच देशाचे प्रभावी नेतृत्व आणि पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर ही जबाबदारी होती. आणि याची स्पष्ट जाणीव नेहरूंना होती. ज्यावेळी राज्यघटनेची निर्मिती सुरू होती त्याचवेळी भारताची धर्माच्या आधारे फळणी करण्यात आली होती. त्यामुळे भारताचे ऐक्य टिकवून ठेवून देशाचा विकास घडवून आणावयाचा असेल तर केंद्राला महत्त्वाचे अधिकार असायला हवेत हा विचार प्रबळ झालेला दिसून येतो. तसेच जगभर कल्याणकारी राज्याच्या कल्पनांमुळे केंद्र व राज्य यांच्यातील सत्ता विभागणीचा समतोल केंद्राकडे झुकलेला दिसून येत होता.या वस्तुस्थितीची कल्पना घटना समितीतील सदस्यांना होती तसेच ती नेहरूंनाही होती.

**भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्यपूर्ण प्रारूप:**

वरील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्यपूर्ण असे प्रारूप तयार झाले आहे.भारताच्या फाळणीनंतर घटना समितीने जगातील इतर संघ राज्यांचे अनुकरण न करता भारताच्या तत्कालीन व भविष्यकालीन गरजा विचारात घेऊन भारतीय प्रारूपाची निर्मिती केली आहे. भारतीय संघराज्याचे प्रारूप निश्चित करताना देशाच्या फाळणीच्या काळातील सांप्रदायिक दंगली, संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न, पाकिस्तानचे आक्रमण, चीनचे तिबेट व उत्तर सीमेसंबंधातील विस्तारवादी धोरण, जगाचे द्विध्रुवीकरण,महासत्तांचे हितसंबंधाचे राजकारण, प्रचंड क्षेत्रफळ आणि लोकसंख्या इत्यादी घटक कारणीभूत असल्याचे दिसून येते. भारताचे विस्तीर्ण असे भौगोलिक क्षेत्रफळ आणि विविधता असणाऱ्या देशात अनेक राज्यांमध्ये व केंद्र शासनामध्ये समन्वय निर्माण करून राज्यकारभार करण्यासाठी प्रबळ व शक्तिशाली केंद्र सरकारचीच आवश्यकता होती. त्यामुळे भारतात घटक राज्यांना मर्यादित स्वायत्तता देऊन प्रबळ केंद्रीय शासन असणारे एकात्म व्यवस्थेकडे झुकणारे संघराज्याचे प्रारूप निर्माण करण्यात आले आहे.

**भारतीय संघराज्य व्यवस्थेची प्रमुख तत्वे:**

सामान्यतः भारतीय संघराज्य निर्मितीची तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**1) केंद्राची समन्वयकाची भूमिका :**

भारतीय संघराज्य व्यवस्थेमध्ये केंद्र शासन व घटक राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय निर्माण करण्याची जबाबदारी केंद्राकडे देण्यात आली आहे. देशातील महत्त्वाच्या घटनात्मक संस्था व घटना बाह्य संस्था केंद्र शासनाकडे आहेत. उदा. नियोजन आयोग, निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग, वित्त आयोग, केंद्रीय तपास यंत्रणा, लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणुका, राज्यपालांची नियुक्ती, इत्यादी महत्त्वाच्या संस्था व नेमणुकांचे अधिकार केंद्र सरकारकडे आहेत. या असमतोल विभागणी मध्ये समतोल निर्माण करण्याची कसरत केंद्र शासनाला करावी लागते.

**2) केंद्र व राज्यांचे परस्पर सहकार्य:**

केंद्र शासन व राज्य शासन यांना राज्यघटनेद्वारे एकमेकांपासून अलग ठेवण्यापेक्षा त्यांच्यामधील धोरणात्मक सहकार्याला महत्त्व देण्यात आले आहे. देशामध्ये शांतता व सुव्यवस्था तसेच विकास कार्यक्रमात केंद्र व राज्यांचे परस्पर सहकार्य अपेक्षित आहे. याबरोबरच राज्या- राज्यातील संबंधही स्पर्धेऐवजी सहकार्याचे असावेत. असा विचार या पाठीमागे आहे. त्यामुळे घटक राज्यांची स्वायत्तता, केंद्र- राज्यातील निकोप संबंध या मुद्द्यांना महत्त्व उरत नाही.

**3) राज्यांच्या दर्जाबाबत असमानता:**

अमेरिकन संघराज्यात सर्व घटक राज्यांना समान अधिकार देऊन त्यांना समान दर्जा दिला आहे. समान प्रतिनिधित्व दिले आहे.भारतात मात्र घटक राज्यांना गरजेनुसार वेळोवेळी वेगवेगळी वागणूक देता येईल अशी मुभा ठेवली आहे. भारतीय

संसदेचे राज्यसभा हे गृह घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करते, परंतु हे प्रतिनिधित्व असमान आहे. काश्मीरला 370 कलमाद्वारे वेगळा दर्जा देण्यात आला आहे. 371 कलमाद्वारेही काही राज्यांसाठी खास तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. ईशान्येकडील काही राज्यांमध्ये स्वायत्त परिषदा स्थापन करण्यात आल्या आहेत. भारतीय संविधानातील या खास तरतुदी पाहिल्यास भारताचे संघराज्य हे असमान राज्यांचे संघराज्य असल्याचे दिसते. तसेच केंद्रशासित प्रदेशही निर्माण केले आहेत. घटक राज्यांची राजकीय, सामाजिक, आर्थिक, भौगोलिक परिस्थिती या घटकांच्या आधारे स्तरिकृत व्यवस्था स्वीकारण्यात आली आहे.

वरील सर्व प्रकारच्या संघराज्यासंबंधी घटनात्मक तरतुदी, असमान व्यवस्था व देशापुढील प्रश्न या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्यांमध्ये तसेच राज्यां-राज्यांमध्ये समन्वय साधून राष्ट्रउभारणी करण्याची ऐतिहासिक जबाबदारी नेहरूंच्यावर पडलेली दिसून येते.

**नेहरूंच्या कालखंडातील भारतीय संघराज्याचे स्वरूप:**

अनेक वैशिष्ट्यांनी युक्त अशा भारतीय संघराज्याची राज्यघटने द्वारे निर्मिती झाल्यानंतर त्याचा प्रयोग 1950 पासून भारतात सुरू झाला. पृथ्वीवरील एकूण मानव वंशापैकी एक सप्तमांशाहून अधिक लोक एकसंध राजकीय घटक म्हणून स्वतंत्र स्वरूपात यापूर्वी कधीही व कोठेही एकत्र आलेले नव्हते. 1950 पूर्वी भारत कधीही एकसंध राजकीय घटक म्हणून अस्तित्वात नव्हता. नेहरूंच्या कालखंडातील भारतीय संघराज्याचे स्वरूप पुढील काही घटकांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**1) प्रबळ केंद्र शासन :**

भारतामध्ये राज्यघटनेच्या माध्यमातून केंद्राला अधिकारदृष्ट्या प्रबळ बनवले आहे. तरीही या कालखंडात भारतीय संघराज्याचे स्वरूप हे राज्यांचा सहकारी महासंघ असे असल्याचे दिसते. केंद्राला देण्यात आलेले ज्यादा अधिकार केंद्र सरकार आपली धोरणे व विकासाच्या योजना राबवण्यासाठी करत असे. राज्यांची गळचेपी करून केंद्र सरकार विषयी असंतोष निर्माण होणार नाही याची काळजी केंद्रातील नेतृत्वाने या काळात घेतलेली दिसून येते.

**2) नियोजन आयोगाला महत्व:**

नेहरूंच्या कालखंडात भारताचा सर्वांगीण विकास नियोजनबद्ध रीतीने करण्यासाठी नियोजन आयोगाची निर्मिती करण्यात आली. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्न केले जाऊ लागले. परंतु या प्रयत्नात सामायिकसूची आणि राज्य सूचीतील विषयांवर केंद्राचे वर्चस्व निर्माण झाले. त्यांची कार्यवाही देखील केंद्राकडे गेलेली दिसून येते.

**3) केंद्राचे आर्थिक प्राबल्य:**

केंद्र सरकारकडून राज्यांना दोन प्रकारचे अनुदान दिले जात होते.एक-वित्त आयोगाच्या शिफारशीद्वारे कलम 275 नुसार महसुलातील 30% हिस्सा अनुदान म्हणून दिला जात असे.आणि दोन- नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकार 70 टक्के अनुदान देत असे. यासाठी राज्यांना केंद्राच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागत असे. आर्थिकदृष्ट्या राज्यांना आपल्या विकास योजनांसाठी केंद्र सरकारवर अवलंबून राहावे लागत असे.

**4) राज्यपाल-केंद्र व राज्यातील दुवा:**

पंडित नेहरूंच्या कार्यकाळात राज्यपाल पदावरील व्यक्तींनी संसदीय शासन पद्धतीच्या संकेतानुसार कार्य केलेले दिसून येते. राज्य सरकारच्या निर्णयात हस्तक्षेप करणे, विधेयके अडवून ठेवणे, पक्षपात करणे या गोष्टी फारशा दिसून येत नाहीत. राज्यपाल हे घटक राज्याचे घटनात्मक प्रमुख म्हणून संसदीय शासन पद्धतीच्या तत्वांचे पालन करत होते. राज्यपालांचे कार्यालय हे राजकारणाचे केंद्र झालेले दिसून येत नाही. राज्यपाल केंद्र व राज्यातील दुवा म्हणून कार्य करत होते.

**5)भाषावार प्रांतरचना:**

स्वातंत्र्योत्तर काळात नेहरूंनी नेहमीच मोठ्या राज्यांच्या पुरस्कार केला. परंतु भारतात भाषेच्या आधारे स्वतंत्र राज्यांच्या मागणी साठी आंदोलने होऊ लागली. परिणामी केंद्र सरकारने1956 मध्ये भाषावर प्रांत रचना केली. केंद्र सरकारचा कल मोठी राज्ये तयार करण्याकडे होता. या मोठ्या राज्यातील विविध भाषेच्या लोकांनी स्वतंत्र राज्यांची मागणी सुरू केली. त्यातूनच महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, हरियाणा ही राज्ये निर्माण झाली. या ठिकाणी नेहरूंनी आपला आग्रह बाजूला ठेवून लोकांच्या इच्छेनुसार घटक राज्यांची निर्मिती केलेली दिसून येते.

**6)केंद्रीय नेतृत्वाचा प्रभाव:** भारतात स्वातंत्र्यानंतर केंद्रीय स्तरावर आणि राज्यस्तरावर एकाच पक्षाची राजवट असल्याने संघराज्याचा घटनात्मक समतोल भारतात निर्माण होऊ शकला नाही. केंद्रीय स्तरावरील नेहरुंचा प्रभाव

राज्यस्तरावरील नेतृत्वावर पडलेला होता. तसेच पक्षाच्या रचनेत केंद्रीय पक्ष नेत्यांचे स्थान हे श्रेष्ठ होते.आणि राज्य पातळीवरील नेत्यांचे स्थान दुय्यम असल्याचे दिसून येते. केंद्र सरकारच्या व पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत केंद्रीय नेतृत्वाचा प्रभाव असलेला दिसून येतो. याचा परिणाम केंद्र-राज्य संबंधावर पडल्याचे दिसते.

**नेहरूंच्या कालखंडातील केंद्र व राज्य यांच्यातील सहकार्य व संघर्षाचे स्वरूप :**

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडातील केंद्र सरकार व घटक राज्ये यांच्यातील सहकार्याचे व मतभेदाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी पुढील घटकांच्या अनुषंगाने विचार करावा लागतो.

**1) केंद्र व राज्यात एकाच पक्षाचे सरकार:**

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रीय स्तरावर व राज्यांमध्ये एकाच पक्षाचे सरकार होते. आणि या दोन्ही स्तरावर जवाहरलाल नेहरूंचा मोठा प्रभाव पडलेला होता. त्यामुळे या काळात केंद्र व राज्य यांच्यात सहकार्य प्रस्थापित करण्यात बऱ्यापैकी यश आले होते. केंद्राने समन्वयकाची भूमिका स्वीकारलेली दिसून येते. स्वातंत्र्यानंतर 50 च्या दशकात विकासाचे राजकारण प्रभावी होते. तसेच नेहरूंच्या प्रभावी नेतृत्वामुळे घटक राज्यांनी त्यांना सहकार्य केले. देशा पुढील तातडीचे प्रश्न सोडविणे हेच केंद्र व राज्य सरकार पुढील उद्दिष्ट होते.

**2)राज्यस्तरावर केंद्रीय नेतृत्वाचा कमीत कमी हस्तक्षेप:**

नेहरूंच्या कालखंडात राज्य पातळीवरील नेतृत्वाला राजकारणाबाबत मोकळीक होती.नेहरूंनीही प्रादेशिक नेतृत्वाला वेळोवेळी संधी दिलेली दिसून येते. उदाहरणार्थ यशवंतराव चव्हाण यांना राज्य पातळीवरून केंद्रीय पातळीवर नेहरूंनीच बोलावून घेतले होते. राज्यस्तरावरील नेत्यांना प्रत्येक निर्णयासाठी दिल्लीला जावे लागत नव्हते. राज्य पातळीवर निर्णय घेण्याची मुभा होती. केंद्रीय नेतृत्व राज्य सरकारच्या कारभारात व पक्षीय राजकारणात कमीत कमी हस्तक्षेप करत असे.

**3) राजपातळीवरील नेतृत्वाशी संवाद :**

नेहरू राज्यस्तरावरील नेतृत्वाला विश्वासात घेऊन वेळोवेळी केंद्र सरकारच्या धोरणांविषयी माहिती व मार्गदर्शन करत असत. त्यांच्याशी संवाद ठेवत असत. त्यामुळे केंद्राच्या धोरणांची अंमलबजावणी राज्यांकडून उत्साहाने केली जात असे. प्रत्यक्षात केंद्र सरकार व नियोजन आयोगाच्या योजनांमुळे राज्यांचे अधिकार मर्यादित होत असत, परंतु नेहरूंविषयी राज्य पातळीवरील नेतृत्वाला फारशी भीती वाटत नव्हती. त्यांना केंद्रीय नेतृत्वाबद्दल विश्वास व आदर वाटत होता. तसेच राज्यातील नेत्यांना आपले नेतृत्व पक्षीय पातळीवर आणि प्रादेशिक पातळीवर विस्तारण्याची मुभा नेहरूंच्या कालखंडात होती. भारतासारख्या देशाचा राज्यकारभार करण्यासाठी राज्य पातळीवर सुद्धा सक्षम नेतृत्व तयार झाली पाहिजे या उद्देशाने नेहरूंनी राज्य पातळीवरील नेतृत्वालाही सहकार्य केले.

**4)राष्ट्रउभारणीला प्राधान्य :**

नेहरूंच्या कार्यकाळात भारतासमोर सर्वात महत्त्वाचे कार्य हे राष्ट्र उभारणीचे होते. त्या दृष्टीने राज्यांच्या स्वायत्ततेपेक्षा प्रबळ केंद्र सरकारची गरज होती. त्या काळात घडणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटना पाहता दुर्बल केंद्र सत्ता देशाच्या प्रगतीसाठी व स्वातंत्र्यरक्षणासाठी उपयुक्त ठरणार नाही, असा विचार करण्यात आला. केंद्र दुर्बल झाल्यास समन्वयकाची भूमिका पार पाडता येणार नाही. केंद्र सरकार दुर्बल व अधिकारहीन असेल तर घटकराज्यांकडून राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न दुर्लक्षिले जातील. देशाची राजकीय, सामाजिक, आर्थिक पुनर्रचना करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची होती. त्यासाठीच संविधानाद्वारे केंद्र सरकार प्रबळ बनवले आहे. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, वाहतूक, वीज निर्मिती, बांधकाम, वैज्ञानिक व तांत्रिक विकास, कृषी विकास या गोष्टींच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करणे केंद्र सरकारलाच शक्य होते. नेहरूंनी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्धरीत्या राष्ट्र उभारणी या काळात केलेली दिसून येते.

**5) मुख्यमंत्र्यांना नियमित मार्गदर्शन:**

जवाहरलाल नेहरू पंतप्रधान झाल्यानंतर घटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी पत्रांच्या माध्यमातून सातत्याने संवाद साधत असत. देशापुढील महत्त्वाचे प्रश्न, धोरण विषयक निर्णय, याबाबत मुख्यमंत्र्यांना ठराविक अंतराने पत्र लिहून त्यांना विश्वासात घेत असत. त्यांच्या पत्रात देशापुढील प्रश्न, आंतरराष्ट्रीय राजकारण, त्यांना भेटलेले परदेशी नेते, त्या नेत्यांशी झालेली चर्चा याबाबत सविस्तर माहिती दिलेली असे. देशाचा राज्यकारभार,आर्थिक विकास, संघराज्याचा व संसदीय लोकशाहीचा नवा प्रयोग याविषयी नेहरूंच्या पत्रात ऊहापोह केलेला असे. नेहरू हे रशिया व चीनच्या आर्थिक विकासाने प्रभावित झालेले होते.ते स्वतः रशियातील शेती उद्योग शिक्षण इत्यादी गोष्टी पाहून आले होते. त्यासंबंधी बरीच माहिती मिळवून ती त्यांनी मुख्यमंत्र्यांना पुरविली होती.05 ऑगस्ट 1954 च्या पत्रात ते लिहितात,“आपल्या समोरचा प्रश्न असा आहे की, आपली

उद्दिष्टे लोकशाही नियोजनाच्या मार्गाने कशी साध्य करता येतील?अशा तऱ्हेचे(रशियाप्रमाणे) नियोजन व हुकूमशाहीचा मार्ग आणि सत्तीचा वापर जेवढे आर्थिक यश मिळवू शकतो, तेवढे कदाचित आपल्याला मिळणार नाही. तरीही आम्ही लोकशाही मार्ग सोडणार नाही. कारण काही मूल्ये आम्ही मनाशी जपली आहेत. नेहरूंना भारताचा विकास सत्तीच्या व हुकूमशाहीच्या मार्गाने करावयाचा नव्हता. लोकशाही मूल्यांची तडजोड करून जलद गतीने होणारा विकास त्यांना नको होता. तर तो लोकशाहीच्या मार्गाने हळुवारपणे घडवून आणावयाचा होता.

**6)सहकारी संघराज्य:**

स्वातंत्र्यानंतर भारताने अंगीकारलेल्या नियोजित आर्थिक विकासाची पूर्तता करण्यासाठी नियोजन आयोगासारख्या यंत्रणेची गरज होती. राज्यांशी चर्चा करूनच विकास योजनांसंबंधी निर्णय घेतले जात असत. तसेच केंद्र व राज्यांमध्ये सुसंवाद निर्माण करण्यासाठी 1952 मध्ये राष्ट्रीय विकास परिषद निर्माण करण्यात आलेली होती. या परिषदेच्या माध्यमातून विकास योजनांचे प्राधान्यक्रम ठरविले जात होते. विकास योजना निर्मितीच्या कार्यात राज्यांनाही सहभागी करून घेतले जात होते. त्यामुळे नेहरूंच्या कार्यकाळात देशात सहकारी संघराज्याच्या प्रयोगाला यश आलेले दिसून येते.

**7) काश्मीर सरकारची बरखास्ती:**

स्वातंत्र्यानंतर जम्मू- काश्मीर संस्थान भारतात विलीन होताना त्याला वेगळा दर्जा देणारे कलम 370 राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले.परंतु तत्कालीन परिस्थिती व राजकीय घडामोडींमुळे व्यवहारात त्याची अंमलबजावणी झाली नाही. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी काश्मीरचे मुख्यमंत्री (पंतप्रधान) शेख अब्दुल्ला यांचे सरकार 1953 मध्ये बरखास्त करून त्यांना अटक करण्यात आली.काश्मिरची राज्यघटना तयार होण्यापूर्वीच केंद्र सरकारने 1954 मध्ये अध्यादेश काढून भारतीय राज्यघटनेतील अनेक भाग जम्मू-काश्मीरला लागू केले. त्या काळात काश्मीरमधील पाकिस्तानचा हस्तक्षेप, शेख अब्दुल्लांची बदलती भूमिका व महासत्तांचे हितसंबंध या बाबींचा विचार करता केंद्राचा हस्तक्षेप उचित वाटतो. परंतु संघराज्य व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून विचार करता घटकराज्यांच्या अधिकारांचा संकोच केल्याचे दिसते.तसेच सहकारी संघराज्याच्या तत्त्वाला देखील छेद गेल्याचे दिसून येते. परंतु नेहरूंनी या प्रश्नात देशाचे ऐक्य, एकात्मता व परकीय हस्तक्षेपाला अटकाव करण्यासाठी वरील निर्णय घेतल्याचे दिसून येते.

**8) केरळ सरकारची बरखास्ती :**

1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्यानुसार केरळ राज्याची निर्मिती करण्यात आली या राज्याची पहिली निवडणूक 1957 मध्ये घेण्यात आले व त्यामध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पाच अपक्षांच्या मदतीने सरकार बनविले आणि ई एम एस नंबुद्रीपाद हे मुख्यमंत्री बनले.भारतातील पहिले बिगर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. परंतु केरळमधील काँग्रेसने या सरकारविरुद्ध आंदोलन सुरू केले. आंदोलनाच्या दबावाखाली केंद्र सरकारने 356 व्या कलमानुसार केरळ सरकार बरखास्त केले.या निर्णयाने सहकारी किंवा समन्वयवादी संघराज्य व्यवस्थेला धक्का पोहोचलेला दिसून येतो. भारतात बहुपक्ष पद्धती स्वीकारली असून विरोधी पक्ष घटक राज्यांमध्ये सत्तेवर येऊ शकतो, या वास्तवाकडे दुर्लक्ष करण्यात आले.स्वातंत्र्यानंतर कम्युनिस्ट पक्षाने भारतीय राज्यघटना स्वीकारलेली नव्हती त्यामुळे कम्युनिस्ट विचारप्रणाली व्यक्तीस्वातंत्र्याला विरोध करणारी, पक्षीय हुकूमशाही व हिंसेचा पुरस्कार करणारी असल्याने साम्यवादी विचार प्रणालीचा प्रसार रोखण्यासाठी हे सरकार बरखास्त केले असावे असे दिसून येते.

**निष्कर्ष:**

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडातील भारतीय संघराज्याच्या वाटचालीच्या आढावा घेतल्यानंतर पुढील निष्कर्ष काढता येतात.

1) भारतीय संघराज्य हे केंद्रोत्सारी पद्धतीने विकसित झालेले असल्याने त्या काळातील राजकीय,सामाजिक व आर्थिक प्रश्नांचे स्वरूप पाहता केंद्र सरकार प्रबळ असणे गरजेचे होते. त्यामुळे राज्यघटनेच्या माध्यमातूनच एकात्म शासन पद्धतीकडे झुकलेले संघराज्याचे वैशिष्ट्यपूर्ण असे भारतीय प्रारूप स्वीकारण्यात आले.

2) स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरूंनी राज्यांना जादा अधिकार देणारे संघराज्य असावे असे मत व्यक्त केले असले तरी स्वातंत्र्यानंतर वस्तुस्थितीचा विचार करून देशाचे ऐक्य, एकात्मता आणि नियोजित विकास यासाठी केंद्र शासन प्रबळ बनवलेले दिसून येते.

3) स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रीय स्तरावर आणि राज्यस्तरावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व असल्याने नेहरूंना आपल्या कल्पनेतील विकास योजना व प्रकल्प राबविणे शक्य झालेले दिसून येते. घटक राज्यांचे सहकार्य नेहरूंना मिळालेले दिसून येते.

4) आर्थिक दृष्ट्या केंद्र सरकार प्रबळ असूनही नेहरूंच्या काळात घटक राज्यांची गळचेपी,अडवणूक किंवा भेदभाव झालेल दिसून येत नाही. राज्यातील नेतृत्वाला विश्वासात घेऊन, त्यांच्याशी संवाद साधून सहकार्य मिळवलेले दिसून येते. केंद्रात व राज्यांत एकाच पक्षाचे सरकार असल्यामुळे भारतीय संघराज्याचे स्वरूप सहकारी संघराज्याचे राहिलेले दिसून येते.

5) नेहरूंच्या कालखंडात राष्ट्र उभारणीच्या कार्याला प्राधान्य देण्यात आले होते. नियोजन आणि पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास योजना राबविण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. केंद्र सरकार नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार घटक राज्यांना विकास योजनांसाठी निधी देत असे. त्यामुळे केंद्रावर राज्यांचे आर्थिक अवलंबित्व असलेले दिसून येते.

6) काश्मीर व केरळ सरकारची बरखास्ती ही संघराज्य व्यवस्थेच्या तत्त्वांना छेद देणारी असली तरीही देशाचे ऐक्य आणि एकात्मतेला बाधा पोहोचू नये, देशासमोर कोणतेही नवे संकट निर्माण होऊ नये यासाठी कश्मीर व केरळ मधील सरकार बरखास्त केल्याचे दिसून येते.

**संदर्भ:**

1) पालखीवाला नानी,(अनु. वाळिंबे वि.स.) वुई दी पीपल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2002.

2) भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, 2012.

3) चपळगावकर नरेंद्र, पंतप्रधान नेहरू, मौज प्रकाशन गृह, मुंबई, 2022.

4) जोशी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद,2015.

5) पळशीकर सुहास, राजकारणाचा ताळेबंद, साधना प्रकाशन, पुणे, 2022.

6) साठे सत्यरंजन, भारताच्या राज्यघटनेची 50 वर्षे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,2022.

7) कल्याणकर बा.ह., संपादित, पंडित जवाहरलाल नेहरू: व्यक्ती आणि कार्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,2002.

8) पवार दीपक, संपादित, लोकशाही समजून घेताना, मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य, मुंबई, 2022.

9) https://mr.m.wikipedia.org